FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154205

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. मुंबई, पहिली खबर क्र. FIR No. 47, वर्ष Year 2021, दिनांक Date 19/11/2021

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि. 1988, कलमे Sections 7, 7(अ), 12
   (ii) अधिनियम Act ............, कलमे Sections ............
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day बुधवार / गुरुवार, तारीख पासून Date from 17/11/21, वेळ Time 10:15, तारीख पर्यंत Date to 18/11/21, वेळ Time 16:52

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 16/11/2021, वेळ Time 11:00

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 09/2021 तारीख Date 19/11/21, वेळ Time 10:25

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ............, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ............
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव, ठिकाणाचे नंबर, गल्ली, रस्त्याचे नाव Address of Occurrence Name, No. if any, Ward, Name of road: ① हबीबिया मशिदचे समोर, ब्रीजचे खाली जोगेश्वरी प) मुंबई. ② सिटी पार्क गार्डन, बीकेसी, बांद्रा, (पुर्व) मुंबई.
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ............, गाव ............, पोस्ट ............, तालुका ............, जिल्हा ............, राज्य ............
   Nearest identifiable place, Village, Post, Taluka, Dist., State
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ............, तालुका ............, जिल्हा ............, राज्य ............
   In case, outside the limit of this Police Station, Taluka, Dist., State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name अहमद खान (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name मोहमद खान
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 53 वर्ष (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 8879083135
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ............, दिल्याचा दिनांक Date of Issue ............ दिल्याचे ठिकाण Place of Issue ............ (f) व्यवसाय Occupation ............
   (g) धर्म Religion मुस्लीम, जात Caste ............ जनजात Sub-Caste ............
   (h) पत्ता Address : रूम. 415, R1 बिल्डींग, आस्मान कॉम्प्लेक्स गोरेगाव, मुंबई.
   गल्ली / सर्व्हे नं. Ward ........ घर / नाव नं. House/Name No. ........ फोन / मो. नं. Phone/Mo. No. ........ पॅन नं. PAN No. ........ वोटर्स नं. Card No. ........
   रस्त्याचे नाव Road ............, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ............, गाव Village ............, पोस्ट Post ............, पो. स्टे. P. Stn. ............
   तालुका Taluka ............, जिल्हा Dist. ............, राज्य State ............, सध्याचा पत्ता Present Address ............

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   ① शहाजी पांडुरंग जोशी, वय- 42 वर्षे, व्यवसाय सहा. समाज विकास अधिकारी, MMRDA बांद्रा, मुंबई.
   ② श्रीमती संगिता अतुल टकले, वय - 50 वर्षे, व्यवसाय उपजिल्हाधिकारी, MMRDA, बांद्रा, मुंबई.
   ③ जगदिश शिवराम पाटील, वय - 36 वर्षे, खाजगी इसम.

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

Scanned with CamScanner

यातील फिर्यादी अहमद खान मोहमद खान, वय ५३ वर्ष, धंदा व्यवसाय (फेब्रिकेशन) रा. ठि. रुम नं. ४१५, आर -१ बिल्डींग, अस्मी कॉम्प्लेक्स, गोरेगाव (प), मुंबई यांचा स्वतंत्र्य कागदावर संगणकावर टंकलिखित केलेली फिर्याद हीच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे.

Ahmed

समक्ष

(स्वप्निल बेडसे)
पोलीस निरीक्षक
ला. प्र. वि. मुंबई.

Scanned with CamScanner

# फिर्याद

दिनांक – १९/११/२०२१

मी, अहमद खान मोहमद खान, वय ५३ वर्षे, धंदा–व्यवसाय, (फेब्रिकेशन), रा.ठि. आसिम कॉम्प्लेक्स, आर–१ बिल्डींग, रुम नं. ४१५, राममंदिर रोड, गोरेगांव (प), मुंबई ४०००१०४, मो.नं. ८८७९०८९१३५.

----

मी वरीलप्रमाणे असून वर नमूद पत्यावर गेल्या अकरा वर्षापासुन मी माझे कुटुंबियांसह राहावयास आहे. तसेच माझा स्वत:चा फेब्रिकेशनचा व्यवसाय आहें.

माझे राजारामवाडी, अलीयावर जंग मार्ग, विले पाले, पुर्व, मुंबई येथे १५० स्क्वेअर फुट चा रुम होता. सदरची रुम सहार एअरपोर्टचा विस्तार करण्यासाठी तोडण्यात आली होती. विस्तार प्रकल्पातील झोपडीधारकांची पात्रता मा. उपजिल्हाधिकारी (अति. निष्कासन) तथा सक्षम प्राधिकारी, वांद्रे–१ यांनी निश्चित केली होती त्यात माझी रुम अपात्र ठरविली होती. त्याबाबतची योग्य ती कागदपत्रे सादर केल्यानंतर माझी रुम पात्र ठरविण्यात आली होती. त्यानंतर मला रुम वाटप करण्यात येणार होती. परंतु मला रुम वाटप न झाल्याने मी अनेकवेळा एमएमआरडीए बांद्रा ऑफिसमध्ये गेलो परंतु माझे काम झाले नाही. त्यामुळे मी अंदाजे १५ दिवसांपुर्वी एमएमआरडीए बांद्रा ऑफिसमध्ये गेलो असता तेथील कार्यालयात काम करणारे शहाजी जोशी यांनी मला वर नमूद कामाबाबत १,५०,०००/– रुपये लाच मागुन त्यातील काही रक्कम संगिता टकले मॅडमला द्यावे लागतील त्यानंतरच माझे काम होईल असे सांगितले. मला लोकसेवक शहाजी जोशी व संगिता टकले मॅडम यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि. १६/११/२०२१ रोजी लाप्रवि मुंबई विभाग येथें येवून पोनि स्वप्निल बेडसे यांचेकडे तक्रार दिली होती. त्याप्रमाणे पो.नि बेडसे यांनी माझा तक्रार अर्ज लिहून घेतला व त्यावर माझी सही घेवून तक्रार अर्ज त्यांचे ताब्यात घेतला. सदरबाबत पडताळणी करण्यासाठी दि. १७/११/२०२१ रोजी सकाळी लाप्रवि, मुंबई येथे येणेबाबत सांगितले.

त्यानुसार मी दि. १७/११/२०२१ रोजी सकाळी ११:०० वा. लाप्रवि,मुंबई येथे आलो असता पो.नि. बेडसे यांनी यांनी दोन शासकिय पंचांना बोलावून घेतले. व सापळा पथकातील सपोआ सरदार नाळे, पंच व अंमलदार यांची ओळख करून दिली. पो.नि बेडसे यांनी माझ्या तक्रार अर्जाची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे मला सांगितले. त्याप्रमाणे पो.नि बेडसे यांनी पंचाना मी दि. १६/११/२०२१ रोजी दिलेला तक्रार अर्ज वाचण्यास दिला व त्यानंतर पो.नि. बेडसे यांच्या सुचनेवरून पंचांनी सदर तक्रार अर्जावर दि. १७/११/२०२१ रोजी स्वाक्षऱ्या केल्यानंतर पो.नि. बेडसे यांनी देखील समक्ष म्हणून स्वाक्षरी करून सदरचा तक्रार अर्ज त्यांचे ताब्यात घेतला.

मी दिलेल्या तक्रारीनुसार पो.नि बेडसे यांनी लोकसेवक लाचेची मागणी करीत आहेत किंवा कसे? याबाबत पडताळणी करण्यात येणार असून सदर संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरव्दारे मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात येईल. असे सांगितले. त्यानंतर पोनि बेडसे यांनी पडताळणीबाबत पंचाना सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस पथकाची ओळख करुन दिली. व लोकसेवकांनी माझेकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यास, त्यावेळेनुसार तात्काळ सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर पो.नि. बेडसे हे मला व पंच, सपोआ. नाळे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील गोपनीय कक्षात घेवून गेले व तेथे उपस्थित असलेले पो.ना.क्र. ०३–२११/मठपती यांचेशी ओळख करुन दिली.

त्यानंतर पो.नि. बेडसे हे कक्षाबाहेर जावून एक डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व मायक्रो एस.डी. कार्ड घेवून आले व प्रथम डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये दोन नवीन सेल टाकून तो चालू केला व सदरच्या डिजिटल व्हॉईस

Scanned with CamScanner

रेकार्डर फॉरमॅट करुन त्यामध्ये कोणतेही पुर्वीचे रेकॉर्डींग नसल्याची पंचांची खात्री करून दिली. व डिजिटल व्हाईस रेकॉर्डर व मायक्रो एस.डी. कार्ड बाबत माहीती देवून पडताळणी कारवाईत वापरण्यात येणार असल्याचे मला व पंचांना सांगितले.

त्यानंतर पो.नि. बेडसे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस डी कार्ड मध्ये स्वत:चे व माझे आणि पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केल्यानंतर पो.नि. बेडसे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद केला.

त्यानंतर मी, पो.नि. बेडसे, सपोआ नाळे, पंच व सापळा पथक असे गोपनिय कक्षातून बाहेर पडून ब्युरो कार्यालयाच्या आवारात उभी असलेल्या दोन पोलीस वाहनाजवळ आलो असता अनुक्रमे तेथे चालकांची ओळख पो. मोकल व सय्यद व अशी करून दिली. त्यानंतर पो.नि. बेडसे यांच्या सुचनेवरुन मी, पोनि बेडसे, सपोआ नाळे, पंच व दोन पोलीस अंमलदार असे एका वाहनात बसलो व उर्वरीत पोलीस पथक दुसऱ्या वाहनात बसले. व दोन्ही वाहने बीकेसी येथील एमएमआरडी कार्यालयाच्या पाठीमागील बाजूचे रस्त्याने आरबीआय कार्यालयाच्या पाठीमागील बाजुस आलो. तसेच पोनि बेडसे यांनी दुसरे शासकीय वाहनातील पडताळणी पथकातील अंमलदारांना संपर्क करून त्यांना विलेपार्ले सव्हिस रोड येथे रस्त्याच्या कडेला शासकीय वाहनातच थांबून राहण्याच्या सुचना दिल्या.

पो.नि.बेडसे यांनी त्यांच्या ताब्यात असलेला सोनी कंपनीचा डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून माझ्या छातीला शर्टाच्या आतील बनियला अडकवला. त्यानंतर मी पोलीस वाहनातून उतरून पायी चालत पंच क्र. १ श्री. मोरे यांचे सोबत लोकसेवकाचे एमएमआरडीए कार्यालयातील चौथ्या मजल्यावर गेले असता कार्यालयाच्या बाहेर सुरक्षा रक्षक असल्याने मी पंच श्री. मोरे यांना हाताच्या इशाऱ्याने तेथील लॉबीमध्ये थांबण्यास सांगुन मी कार्यालयाच्या आत गेलो. तेथे मला लोकसेवक सहाय्यक समाज विकास अधिकारी शहाजी जोशी यांची भेट झाली त्यानंतर मी त्यांच्या माझे सदनिकेच्या अलॉटमेंट लेटरसंदर्भात चर्चा केली असता, लोकसेवक जोशी हे मला त्यांचे वरिष्ठ असलेल्या डेप्युटी कलेक्टर श्रीमती टकले मॅडम यांचे कॅबिनमध्ये घेवुन गेले. त्यानंतर श्रीमती टकले मॅडम यांच्याशी मी माझे घराच्या अलॉटमेंट लेटरबाबत चर्चा केली असता, लोकसेवक जोशी याने मला मी मागणी केलेली रूम सोडुन दुसरी रूम पाहण्यास सांगुन वेरिफाय करून येण्यास सांगितल्याने मी तेथुन निघुन परत पोलीस वाहनाजवळ आलो. त्यानंतर पोनि. बेडसे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करून आम्हा पंच, सपोआ नाळे व तक्रारदार यांनी सदर व्हॉईस रेकॉर्डमार्फत मायक्रो एस डी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. त्यावेळी नमुद संभाषणमध्ये लोकसेवकाने माझेकडे कामा संदर्भात चर्चा केली परंतु लाचेची मागणी केली असल्याचे स्पष्ट झाले नाही. त्यानंतर पो.नि. बेडसे यांनी स.पो.आ. नाळे यांचेशी चर्चा करुन थोडया वेळाने पोनि बेडसे यांचे सुचनेनुसार मी माझे मोबाईल क्र.८८७९०८९१३५ वरुन लोकसेवक श्री. शहाजी जोशी यांना त्यांचे मो.क्र. ८६९३००२३२५ यावर फोन लावून लाऊड स्पिकरवर केला व लोकसेवकाने सागितलेप्रमाणे रुम बघायला गेलो परंतू सेक्युरीटी गार्डने सोडले नसल्याचे सांगुन लोकसेवक जोशी यांस भेटण्याबाबत विचारले असता, लोकसेवक जोशी यांनी भेटावयास येण्यास सांगितले.

समक्ष,

(स्वप्निल बेडसे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

Scanned with CamScanner

त्यानंतर पो.नि. बेडसे यांनी पुन्हा डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टच्या आतील बनियनला लावला व पंच मोरे यांचेसह पोलीस वाहनातुन उतरुन लोकसेवकास भेटण्यासाठी चालत त्यांच्या कार्यालयात गेलो असता, तेथे मला लोकसेवक श्री. जोशी यांची भेट झाली त्यानंतर मी त्यांनी सांगितल्याप्रमाणे रूम वेरिफाय करण्याकरीता विद्याविहार कुर्ला येथे जावून आलो असल्याचे सांगतिले परंतु सेक्युरिटी गार्डने आत सोडले नसल्याचे मी लोकसेवक श्री जोशी यांना सांगितले व तुम्हीच काहीतरी मार्ग काढा असे त्यांना म्हणालो असता, लोकसेवक श्री. जोशी यांनी सिक्युरिटी गार्ड यांस फोन लावुन '' कौनसा रूम खाली है.... पाचसौ दो खाली है ना ... '' अशी विचारणा केली. त्यावर लोकसेवक जोशी सिक्युरिटी गार्ड यांस फोनवर छेसो आठ ..... आठसो एक खाली है असे बोलत असताना, मी लोकसेवकास ' नही नही उतना उपर नही भेजो मम्मी हेल्दी है ' असे सांगितल्यावर लोकसेवकाने सेक्युरिटी गार्ड यांस 'हा...तो कौनसा है निचे का' असे विचारणा केल्यावर ' पाचसो आठ तो कॉर्नरवाला रुम है ना ' असे विचारले. त्यावर मी लोकसेवकास 'प्लीज सर...वो है' असे म्हणालो. त्यानंतर मी लोकसेवक श्री. जोशी यांचेसोबत नमुद सदनिकेच्या अलॉटमेंट लेटरसंदर्भात चर्चा केली असता, लोकसेवक जोशी यांनी मला कागदावर एक लाख पन्नास हजार अकांत लिहुन लाचेची मागणी केली असता, मी त्यांना 'आप खुद बोले इसलिए .....एक लाख पचास हजार जादा है...कुछ रिजनेबल करो..' असे बोललो असता, लोकसेवक जोशी यांनी यामध्ये त्यांचे वरिष्ठ श्रीमती टकले मॅडमचे देखील पैसे असल्याचे मला सांगितले. त्यावर मी त्यांना लाचेची रक्कम कमी करण्याविषयी विनंती केली असता, मॅडमशी बोलुन घेतो असे लोकसेवकाने मला सांगितले. त्यावर मी लोकसेवकास तुम्ही काय ते सांगा असे बोललो असता, त्यांनी मला पुन्हा कागदावर एक लाख तीस हजार अकांत लिहुन दाखविले त्यावर मी लोकसेवक जोशी यांस एक लाख रूपयापर्यंत नाही होणार का? असे विचारले असता, लोकसेवकाने मला 'मॅडम सोबत डिसकस करतो ' असे सांगितले. त्यावर मी तुम्ही काय ते फायनल सांगा अशी विनंती करून 'अरे सर क्यु पेपर वेस्ट कर रहे हो..' असे म्हणालो असता, लोकसेवकाने पुन्हा कागदावर एक लाख वीस हजार रूपये अंकात लिहुन मला 'फायनल' असे बोलेले. असे बोलुन एक लाख वीस हजार रूपये स्वत: व त्यांचे वरिष्ठ अधिकारी श्रीमती टकले यांचेकरीता स्विकराण्याचे कबुल केले. त्यावर मी घरी जावुन बायकोशी बोलुन कॉल करतो असे म्हणालो. त्यानंतर लोकसेवकाने उद्या येताना मला फोन करून येण्यास सांगितले. त्यानंतर मी शासकिय वाहनाजवळ आलो. तेव्हा पोनि. बेडसे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील मायक्रो एस डी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. त्यावेळी नमुद संभाषणमध्ये लोकसेवकाने माझेकडे कामा संदर्भात चर्चा करून लाचेची मागणी केली असल्याचे स्पष्ट झाले. तसेच लोकसेवकाने मला उदया लाचेची रक्कम घेवून बोलाविले असल्याने पो.नि. बेडसे यांनी माझी व लोकसेवक यांचे प्रत्यक्ष भेटी दरम्यान डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर व्दारे मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये ध्वनीमुद्रित झालेले संभाषण लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयातील गोपनिय कक्षात व्यवस्थित ऐकून संभाषणाची ट्रान्सक्रिप्ट तयार करण्यात येणार असल्याचे सांगून चालक मोकल यांना व दुसऱ्या पोलीस वाहनातील पथकास संपर्क करून वाहन लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात घेण्यास सांगितले. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयातील गोपनिय कक्षात आल्यानंतर पो.नि. बेडसे यांनी डिजीटल रेकॉर्डर चालू करून त्यातील ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकुन ट्रान्सक्रिप्ट तयार केले. त्यानंतर पो.नि. बेडसे यांनी पुढील सापळा कारवाई करीता मला दिनांक १८/११/२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी मुंबई येथे लोकसेवक श्री. जोशी यांनी मागणी केल्याप्रमाणे रुपये १,२०,०००/– घेवुन येण्यास सांगितले.

Scanned with CamScanner

त्याप्रमाणे दिनांक १८/११/२०२१ रोजी ११:१५ वा. मी माझे वैयक्तिक बचतीमधून शिल्लक रुपये १,२०,०००/–च्या भारतीय चलनाच्या ५०० दराच्या २४० नोटा लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी मुंबई येथे घेवुन आलोत्या पो.नि. बेडसे यांनी पुढिल कारवाईकरीता घेवून त्यांच्या झेरॉक्स काढल्या. सदरच्या झेरॉक्स प्रतींवर पंचांनी सही केल्यानंतर पोनि बेडसे यांनी समक्ष म्हणुन सही केली व झेरॉक्स प्रत ताब्यात घेतली. त्यानंतर पो.नि. बेडसे यांनी एका अंमलदारास गोपनिय कक्षात बोलावून त्या अंमलदाराने अँन्थ्रॉसिन पावडरचे गुणधर्माबाबत प्रात्यक्षिक करुन दाखविले व समजावून सांगितले. त्यानंतर पोनि बेडसे यांच्या सुचनेवरून त्या अंमलदाराने रुपये १,२०,०००/–च्या भारतीय चलनाच्या ५०० दराच्या २४० नोटांना अँन्थ्रासीन पावडर लावुन माझे सोबत असलेल्या लाल पांढ–या रंगाच्या प्लॅस्टिकच्या पिशवीत अलगद ठेवली. पोनि बेडसे यांनी मला लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर उजव्या हाताने उजवा कान खाजवावा असा पुर्व नियोजीत इशारा करावा, त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहाथ पकडतील असे सांगितले. दि. १७/११/२०२१ रोजी पडताळणी दरम्यान लोकसेवकाने मला येण्याआधी फोन करण्यास सांगितल्यानुसार मला पो.नि. बेडसे यांनी लोकसेवकास फोन करण्यास सांगितले. त्यामुळे मी लोकसेवक जोशी यास फोन वर संपर्क करुन 'हा नमस्कार जोशी साहेब ... अहमद बोलतोय... अहमद खान'' अशी विचारणा केली त्यावर लोकसेवक यांनी ''हा..हा '' असे उत्तर दिले. त्यानंतर मी लोकसेवक यांना '' आप बोले थे कॉल आनेवाला था...मे कॉल करता हू करके मे वेट कर रहा था..'' असे बोलले असता, लोकसेवक यांनी '' काम करना है तो फिर आवो...हम को कोई दिख्खत नही ऐसी...डॉक्युमेन्ट वैगरा सब रेडी है क्या...'' असे म्हणाले. त्यानंतर मी लोकसेवक जोशी यांस ' हा डॉक्युमेन्ट तो रेडी है...और वो जो आप बोले थे वो भी कर दिया है मैने...मैने इंतजाम कर दिया हू...' असे विचारल्यावर 'हा..'.असे बोलुन लोकसेवक जोशी यांनी मला ' ठिक है तो डॉक्युमेन्ट दिखाने के लिये सब डॉक्युमेन्ट वैगरे सब लेके आना है तो आ जावो...लेके आ जावो...' असे म्हणुन कॉल बंद केला. त्यानंतर लोकसेवक जोशी याचे पैशांचे व्यवहार पाहणारा खाजगी इसम जगदिश पाटील याचा मला फोन येत असल्याने तो मला लाचेच्या रकमेची मागणी करेल असा संशय आल्याने पो.नि. बेडसे यांना त्याबाबत सांगितले. तेव्हा पो.नि. बेडसे यांनी सुचना दिल्यानुसार मी माझे मोबाईलवरुन खाजगी इसम जगदिश पाटील याचे मो.क्र. ९६१९६७७४३७ वर फोन लावून माझे मोबाईलचा स्पिकर फोन चालू केला असता ' हॅलो...अरे यार वो गाडी चला रहा हू ना... इसलिये तो फोन कट गया था..' असे बोललो असता त्यावर खाजगी इसम जगदीश यांनी ' अच्छा...अच्छा...' असे उत्तर दिले. त्यानंतर तक्रारदार यांनी खाजगी इसम जगदीश यांस 'बोलो' असे बोलले असता, खाजगी इसम जगदीश यांनी ' में वही बोल रहा है के पेमेंन्ट का बात हो गया था क्या...' असे म्हणाले. त्यानंतर मला खाजगी इसम जगदीश यांस ' किससे.....' असे विचारल्यावर ' जोशी साहब से....'.असे बोलुन खाजगी इसम जगदीश यांनी मला ' हा मेरे को बोले वो क्या है अहमद भाई का देखने के लिये.....वही पेमेन्ट का में हि देखता हू ना...' असे म्हणाले. त्यावर मी खाजगी इसम जगदीश यांस 'अच्छा पेमेन्ट का मतलब आप देखते है...तो फिर में जोशी साहब से बात करना पडेगा यार...हेलो...अभी क्या बोलू आपको...' असे विचारणा केली

Ahmed

समक्ष,

(स्वप्निल बेडसे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

Scanned with CamScanner

असता, खाजगी इसम जगदीश यांने ' आप जोशी साहब से कन्फर्म कर लो...' म्हणुन कॉल बंद केला. सदरच्या कॉलमधील संभाषण पो.नि. बेडसे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत केले आहे.

तद्नंतर पो.नि. बेडसे यांचे सुचनेवरुन मी माझे मो.क्र.८८७९०८९१३५ वरुन लोकसेवक शहाजी जोशी यांना त्यांचे मो.क्र. ८६९३००२३२५ यावर फोन कॉल करुन मोबाईलचा स्पिकर ऑन केला असता, मी 'नमस्कार जोशी सर ..' अशी विचारणा केली त्यावर लोकसेवक यांनी 'बोलो ' असे उत्तर दिले. त्यानंतर मी लोकसेवक यांना ' सर मे वो आप से बात हुई तो में पेंमेन्ट लेके जब निकला था तो उतने में जगदीश का फोन आया...' असे विचारले असता, लोकसेवक यांनी ' हा..हा...उनको मे बोला...' असे म्हणाले. त्यानंतर मी लोकसेवक जोशी यांस ' हा तो में कनफ्युज हो रहा हू...तो मे पेमेन्ट उनको दे देने का क्या आपको देने का......' असे विचारल्यावर ' नही नही...उनको..... आप लेके आ रहे है क्या.....'.असे बोलुन लोकसेवक जोशी यांनी मला 'मे बाद में तुमको मिलता हू... जगदीश भाई से बात करो' असे म्हणुन कॉल बंद केला. सदरच्या कॉलमधील संभाषण पो.नि. बेडसे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत केले आहे.

त्यानंतर आम्ही लोकसेवकाची भेट घेण्यासाठी शासकिय वाहनाने बांद्रा फ्लायओवर च्या बाजुस सव्हिस रोड लगत येवून थांबलो असता पो.नि.बेडसे यांनी दिलेल्या सुचनेनुसार मी माझे मोबाईलवरुन खाजगी इसम जगदीश पाटील यांसे त्यांचे मो.क्र. ९६१९६७७४३७ यावर फोन कॉल करुन मोबाईलचा स्पिकर ऑन केला असता, मी ' हेलो...जगदीशभाई..' असे बोलली असता, त्यावर खाजगी इसम जगदीश यांनी ' हा अहमद भाई बोलो ना......' असे उत्तर दिले. त्यानंतर मी खाजगी इसम जगदीश यांस 'हा जोशी सर से बात हुई मेरी...वो बोले वो जगदीश... जगदीश को पैसा दे देने के लिये...' असे बोलले असता, खाजगी इसम जगदीश यांनी ' तो फिर...' असे म्हणाले. त्यानंतर मी खाजगी इसम जगदीश यांस ' अभी में कहा आवू........' असे विचारल्यावर ' में इधर हि हू गोरेगाव में है.......'.असे बोलुन खाजगी इसम जगदीश यांनी मला ' जोगेश्वरी वेस्ट में....मस्जिद है देखो... अन्दरवाला रस्ते से... ब्रिज के बाजू में...कोने पें.....' असे म्हणाले. त्यावर मी खाजगी इसम जगदीश यांस ' अच्छा ठिक है......' असे उत्तर दिले असता, खाजगी इसम जगदीश यांने ' उधर हि आ जावो आप को भी अच्छा है......' असे म्हणुन कॉल बंद केला. सदरच्या कॉलमधील संभाषण पो.नि. बेडसे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आले आहे

त्यानंतर आम्ही शासकीय वाहनाने पोलीस पथकासह जोगेश्वरी पश्चिम येथे आल्यानंतर पोनि बेडसे यांनी बाळासाहेब ठाकरे ब्रिजच्या सव्हिस रोड लगत थांबण्यास सांगितले. पो.नि. बेडसे यांचे सुचनेवरुन पुन्हा मला माझे मोबाईलवरुन खाजगी इसम जगदीश पाटील यांसे त्यांचे मोबाईलवर फोन कॉल करुन मोबाईलचा स्पिकर ऑन केला असता, मी ' जगदीशभाई कहा पे है ..' असे बोलली असता, त्यावर खाजगी इसम जगदीश यांनी ' दस मिनीट मे पहुच रहा हुँ......' असे उत्तर दिले. त्यानंतर मी खाजगी इसम जगदीश यांस ' कहा पें बोल रहे थे आप......' असे बोलले असता, खाजगी इसम जगदीश यांनी ' अरे ये मस्जिद के इधर बोला ना में वो... दिवान शटर है ना दिवान शटर...शादी का हॉल ....' असे म्हणाले. त्यानंतर मी खाजगी इसम जगदीश यांस ' ठिक है में आ रहा हू.. ....ओके ' असे उत्तर दिले व कॉल बंद केला. सदरच्या कॉलमधील संभाषण पो.नि. बेडसे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आले आहे.

Scanned with CamScanner

त्यानंतर पो.नि. बेडसे यांनी त्यांच्या ताब्यात असलेला सोनी कंपनीचा डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून माझे शर्टाच्या आतील बनियनला अडकविला. त्यानंतर मी खाजगी इसमास भेटण्याकरीता पोलीस वाहनातुन उतरून जोगेश्वरी रेल्वे स्टेशन पश्चिम, मस्जिदजवळ, दिवान शटरच्या दिशेने चालत गेले. माझे पाठोपाठ पंच श्री. मोरे, सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार काही अंतर ठेवून आजुबाजुने कोणासही संशय येणार नाही अशा रितीने चालत गेले. त्यावेळी सापळा पथक व पंच श्री. गायकवाड हे काही अंतरावर कोणास संशय येणार नाही अश्या स्थितीत उभे होते.

त्यानंतर काही वेळात खाजगी इसम जगदिश पाटील याने मला हाक मारून हाताच्या इशाऱ्याने बोलाविले व मी त्यांच्याशी बोलत बाकडयावर बसलो तेथे खाजगी इसम जगदिश ने मला पैसे आणले किंवा कसे याबाबत विचारले असता मी त्याला हो म्हणून सांगितले त्यानंतर त्याने माझेकडे पैश्याची मागणी केली असता मी माझेकडे असलेल्या लालपांढऱ्या रंगाच्या प्लास्टिकच्या पिशवीत ठेवलेल्या ०३ बंडलांपैकी सुरुवातीस २०,०००/– रुपयाचे बंडल काढून दिले असता जगदिशने ते मोजून घेवून पॅन्टचे खिश्यात ठेवले. त्यानंतर मी त्याला दुसरे ५०,०००/– रुपयाचे बंडल त्याचे हातात दिले असता त्याने ते मोजण्यास सुरुवात केली. तेव्हढयात पोलीस पथकाने खाजगी इसम जगदिश पाटील यांस रंगेहाथ पकडले. त्यानंतर पोलीस पथकाने सदर नोटांचे नंबर तपासुन पाहिले असता ते झेरॉक्समधील नोटांचे क्रमांक हे सारखेच असल्याचे दिसले.

त्यानंतर जोगेश्वरी पश्चिम येथुन खाजगी इसम जगदीश पाटील यांस माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ ताब्यात घेतल्यानंतर पो.नि. बेडसे यांचे सुचनेवरुन खाजगी इसम जगदीश पाटील यांनी त्यांचे मो.क्र.९६१९६७७४३७ वरुन लोकसेवक शहाजी जोशी यांस त्यांचे मो.क्र. ८६९३००२३२५ यावर फोन कॉल करुन त्यांच्या मोबाईलचा स्पिकर ऑन केला असता, खाजगी इसम जगदीश यांनी ' हा भाऊसाहेब ऐका ना...ते भेटलेले अहमद भाय.....' असे बोललो असता, त्यावर लोकसेवक शहाजी जोशी याने विचारले असता त्यावर खाजगी इसम जगदीश याने लोकसेवक जोशी यांस ''हा तर झाल त्यांच्याकडून, घेतले मी एक लाख वीस हजार '' असे उत्तर देवुन 'एक वीस दिले ....... व्यवस्थीत आहे...मोजून बघितले मी.. मी काय बोलत होतो कस करणार आता... कुठे येवू....' असे म्हटले. त्यावर लोकसेवक जोशी यांनी ' नाही नाही...अ..हे कर ना आज नको.. .आज मॅडम नाहीत आज' असे बोलेल असता, खाजगी इसमाने लोकसेवकास ' तर हे घेवून फिरण थोड लफड..हे होणार, त्रास होईल....इकडून विदयाविहारला मला जायच होत मी विचार केला तुम्हाला देता देता मी पुढे निघून जाईल तिकडून...' असे विचारले असता, लोकसेवकाने 'ओके' असे उत्तर दिले. त्यावर खाजगी इसमाने ' तर तुम्ही खाली आला असता तर जरा बर झाल असत...मी तस पुढे निघून जाईन...' असे लोकसेवकास विचारले असता, लोकसेवकाने' फोन कर आल्यावर... ' असे सांगितले व कॉल बंद केला. सदरच्या कॉलमधील संभाषण पो.नि. बेडसे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आले आहे.

त्यानंतर पो.नि. बेडसे यांच्या सुचनेवरून खाजगी इसमास ताब्यात घेवुन नमुद लाचेची रक्कम लोकसेवक शहाजी जोशी यांस देण्याकरीता लोकसेवक जोशी कार्यरत असलेल्या एमएमआरडीए कार्यालय, बांद्रा पुर्व, मुंबई

समक्ष,

(स्वप्निल बेडसे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

Scanned with CamScanner

येथे जाण्याकरीता पंच व पथकासह शासकीय वाहनाने निघालो. बांद्रा पुर्व, एमएमआरडीए कार्यालयाच्या जवळ आल्यानंतर खाजगी इसम जगदीश पाटील याने लोकसेवक जोशी यास मोबाईलवर फोन करून कार्यालयाच्या बाहेर आल्याचे कळविले असता आरोपी लोकसेवक जोशी यांनी सिटी पार्क गार्डन, MMRDA बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्स येथे येण्यास सांगितले.

त्यानुसार सिटी पार्क गार्डनमध्ये आरोपी खाजगी इसम जगदीश येवून थांबला त्यादरम्यान पंच व सापळा पथकातील अधिकारी, अंमलदार हे आरोपी खाजगी इसमाच्या आजुबाजुस सापळा रचुन थांबलेले होते. काहीवेळाने लोकसेवक जोशी आरोपी खाजगी इसमाच्या जवळ येवुन त्याच्याशी बोलत उभा होता. त्यानंतर खाजगी इसम जगदीश याने लाचेची रक्कम लोकसेवक जोशी यास देण्याकरीता समोर केली असता, लोकसेवकाने नमूद लाचेची रक्कम स्विकारताना बघताच सापळा रचुन दबा धरुन थांबलेले अधिकारी व अंमलदार यांनी आम्हा पंचासमक्ष आरोपी लोकसेवक जोशी यांस ताब्यात घेतले. त्यावेळी पो.नि.बेडसे यांनी मला काही अंतरावर जावुन उभे राहण्यास सांगितले.

त्यानंतर पोनि बेडसे व स.पो.आ. नाळे यांनी त्यांची ओळख लोकसेवकास करुन दिली. व पोनि बेडसे व स.पो.आ. नाळे यांनी लोकसेवक जोशी यास त्याचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव शहाजी पांडुरंग जोशी, वय ४२ वर्षे असे सांगून त्यांचे पद सहायक समाज विकास अधिकारी, एम.एम.आर.डी.ए. बांन्द्रा, मुंबई असे आम्हा पंचासमक्ष सांगितले.

त्यानंतर आरोपी लोकसेवक जोशी यांस खाजगी इसमाकडुन लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ ताब्यात घेतल्यानंतर पो.नि. बेडसे यांचे सुचनेवरुन आरोपी लोकसेवक शहाजी जोशी यांना त्यांचे मो.क्र.८६९३००२३२५ वरुन त्यांचे वरिष्ठ लोकसेवक श्रीमती टकले मॅडम यांस त्यांचे मो.क्र. ९८६७१५२८८८ यावर फोन कॉल करुन त्यांच्या मोबाईलचा स्पिकर ऑन केला असता, लोकसेवक श्रीमती टकले मॅडम यांनी सदरचा कॉल रिसीव्ह केला नाही. त्यानंतर पुन्हा श्रीमती टकले मॅडम यांना आरोपी लोकसेवक जोशी फोन केला असता त्यांनी फोन करुन मोबाईल स्पिकरफोन चालू केला असता ' हा मॅडम कुठे आहे....' असे विचारणा केली असता, लोकसेवक टकले मॅडम यांनी लोकसेवक जोशी यांस ' मी आता घरी आहे...' असे म्हणाले. त्यानंतर लोकसेवक जोशी यांनी लोकसेवक टकले मॅडम यांना ' मॅडम ते मला जरा हे करायच होत...अहमदची एक हे होती ना केस...सहार एलवीड...त्यांच्या संदर्भात अॅलॉटमेन्टच्या संदर्भात बोलायच होत...' असे विचारले असता, लोकसेवक टकले मॅडम यांनी 'हा..ओके ते आता सोमवारीच बघुयात ना... आता तरी तीन दिवस सुट्टीच आहे...' असे म्हणाल्या, त्यानंतर सदरचा कॉल कट झाला. त्यांनतर पुन्हा पोनि बेडसे यांचे सुचनेवरुन जोशी याने लोकसेवक श्रीमती टकले मॅडम यांना फोन केला असता लोकसेवक टकले मॅडम यांना ' हा मॅडम.......' असे विचारणा केली असता, लोकसेवक टकले मॅडम यांनी लोकसेवक जोशी यांस ' हा बोला... येतोय आवाज...' असे म्हणाले. त्यानंतर लोकसेवक जोशी यांनी लोकसेवक टकले मॅडम यांना ' हा येतोय...मॅडम ते अहमदच पेमेन्ट आलंय आपल्याला...त्याच काय करायच.......' असे विचारले असता, लोकसेवक टकले मॅडम यांनी ' सोमवारी बघुयातना आपण...हा...हेलो...' असे म्हणाल्या, त्यानंतर सदरचा कॉल पुन्हा नेटवर्क गेल्यामुळे कट झाला. त्यानंतर पुन्हा फोन केला असता ' हा मॅडम.......' असे विचारणा केली असता, लोकसेवक टकले मॅडम यांनी लोकसेवक जोशी यांस ' हा येतोय का आवाज......' असे म्हणाले. त्यानंतर लोकसेवक जोशी यांनी लोकसेवक टकले मॅडम यांना ' हा तेच म्हटल अहमदच ते पेमेंटच आलेलं आहे आपल्याला... हे आपल्याकडे एक लाख आलेत...एक लाख वीस हजारच्या

Scanned with CamScanner

कायतरी आसपास आलेत .......' असे विचारले असता, लोकसेवक टकले मॅडम यांनी ' बघुयात ना सोमवारी... हेलो......' असे म्हणाली. त्यानंतर सदरचा कॉल पुन्हा नेटवर्क गेल्यामुळे कट झाला. सदरचे संभाषण पो.नि. बेडसे यांनी ध्वनीमुद्रित केलेले आहेत.

तद्नंतर पो.नि. बेडसे यांनी आरोपी लोकसेवक शहाजी जोशी यांना खाजगी इसम जगदीश पाटील यांनी फिर्यादी अहमद खान यांचेकडून स्विकारलेली लाचेची रक्कमेबाबत आरोपी लोकसेवक जोशी यांना विचारणा केली असता त्यांनी ती त्यांचे पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली असल्याचे सांगून काढून दिली असता पंच क्र. ०२ श्री. गायकवाड यांनी ताब्यात घेतली.

त्यानंतर पुन्हा पो.नि. बेडसे यांचेसुचनेप्रमाणे पुन्हा लोकसेवकास त्यांचे वरिष्ठ लोकसेवक श्रीमती टकले यांना कॉल करण्याकरीता लोकसेवक शहाजी जोशी यांनी त्यांचे मो.क्र.८६९३००२३२५ वरुन त्यांचे वरिष्ठ लोकसेवक श्रीमती टकले मॅडम यांना त्यांचे मो.क्र. ९८६७१५२८८८ यावर फोन करुन त्यांच्या मोबाईलचा स्पिकर ऑन केला असता, लोकसेवक श्रीमती टकले मॅडम यांनी सदरचा कॉल रिसीव्ह केला. त्यावेळी लोकसेवक जोशी यांनी लोकसेवक टकले मॅडम यांना ' हा मॅडम...सोमवारी आणून देतो मग...ऑफीसला....'असे विचारणा केली असता, लोकसेवक टकले मॅडम यांनी लोकसेवक जोशी यांस ' सोमवारी...सोमवारी ...हा चालेल...चालेल...ओके... ओके...' असे म्हणाले. व सदर कॉल बंद केला. सदरचा कॉल पो.नि. बेडसे यांनी ध्वनीमुद्रित केलेला आहे.

माझे नावे एमएमआरडीए विभागाकडून इमारत क्र. १९/डी एचडीआयएल, कुर्ला पश्चिम, मुंबई मधील सदनिका क्र. ५०८ चे वितरण पत्र (Allotment Letter) मिळण्याकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एम.एम.आर. डी.ए.), मुंबई कार्यालयातील लोकसेवक श्री. शहाजी जोशी यांनी माझेकडे रु. १,५०,०००/– लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रक्कम रू.१,२०,०००/– ही त्याच्या ओळखीचा खाजगी इसम जगदिश पाटील याच्याकडे देणेस सांगितल्यावरून यातील आरोपी खाजगी इसमास नमुद लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यानंतर खाजगी इसमाने सदरची लाच स्विकारलेबाबत लोकसेवक श्री. जोशी यांना खात्री करून दिल्यानंतर लोकसेवक जोशी यांस नमुद लाचेची रक्कम खाजगी इसमाकडुन स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यानंतर सदरची रक्कम स्विकारलेबाबत लोकसेवक जोशी यांनी लोकसेवक श्रीमती टकले यांना कळवुन खात्री करून लोकसेवक श्रीमती टकले यांनी देखील त्यांस संमती दर्शविली. म्हणुन लोकसेवक जोशी यांनी भ्रष्ट व गैरमार्गाने स्वत:च्या व लोकसेवक श्रीमती टकले यांच्याकरीता लाचेची रक्कम स्विकारून तसेच लोकसेवक श्रीमती टकले यांनी गैरकृत्य करून संमती दर्शवून भ्रष्टाचार करण्यास प्रोत्साहन दिले. तसेच खाजगी इसम जगदिश पाटील याने लोकसेवकावर प्रभाव पाडण्यासाठी गैरफायदा घेण्याकरीता लाचेची रक्कम स्विकारली म्हणून माझी त्यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई होण्यास विनंती आहे.

माझा जबाब मराठित संगणकावर टंकलिखित करण्यात आला असून, तो मला हिंदीतुन समजावुन सांगितला, तो माझे सांगणेप्रमाणे, घडलेल्या घटनांप्रमाणे खरा व बरोबर आहे.

समक्ष,

(स्वप्निल बेडसे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

Scanned with CamScanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ...... तात्काळ. ......

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

...... — ......

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ......

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ......

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख वेळी व ठिकाणी यातील आलोसे क्र.1 याने तक्रारदार यांना त्यांचा ओळखीचा खाजगी इसम आरोपी क्र.3 याच्याकडे लाचेची रक्कम रुपये 1,20,000/- ही देण्यास सांगितलेवरुन यातील आरोपी खाजगी इसमास नमूद लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले. त्यानंतर सदरची रक्कम स्विकारलेबाबत आरोपी क्र.01 यास खात्री करुन दि [illegible] नंतर आरोपी (आलोसे) क्र.1 यास रंगेहात पकडण्यात आले. सदरची रक्कम मिळालेबाबत आलोसे क्र.1 याने आलोसे क्र.02 यास कळविले असता त्यांनी त्यास संमती दर्शविली. म्हणून आलोसे क्र.01 यांनी भ्रष्ट व गैरमार्गाने स्वत:च्या व आलोसे क्र.02 यांच्याकरिता लाचेची रक्कम स्विकारुन तसेच आलोसे क्र.02 यांनी गैरलाभ करुन लाचेच्या रक्कमेस संमती दर्शवून भ्रष्टाचार करण्यास प्रोत्साहन दिले तसेच आरोपी क्र.03 खाजगी इसम याने लोकसेवकावर प्रभाव पाडण्यासाठी गैरफायदा होण्याकरिता लाचेची रक्कम स्विकारली म्हणून नमूद आरोपींना विरुद्ध कलम 7, 7(अ), 12 भ्र. प्र. अधिनियम 1988 अन्वये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

...... पोलीस निरीक्षक स्वप्निल बेडसे. ......

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

...... — ......

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......, जिल्हा ......, राज्य ......

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................ Rank.............. No............... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................. (3) Transferred to P. S. ................................................

District.............................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name स्वप्निल बेडसे

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Posting

Code No. of I. O. ......

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..................

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with CamScanner